महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सअॅप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : दुसरे | अंक : ६० वा | दिनांक : २८/११/२०२४ | वार : गुरूवार

## विनोद तावडे भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष होण्याचे संकेत



**नागपूर :** भाजपाच्या राष्ट्रीय अध्यक्षपदाच्या निवडणुकीचे काउंटडाऊन सुरू झाले आहे. सूत्रांवर विश्वास ठेवला तर भाजपाच्या राष्ट्रीय अध्यक्षाची निवडणूक फेब्रुवारीच्या अखेरीस म्हणजेच दिल्ली विधानसभा निवडणुकीनंतर होणार असून सरचिटणीस विनोद तावडे हे राष्ट्रीय अध्यक्ष होण्याचे संकेत पक्षाने दिले आहे.

यापूर्वी संघटनात्मक निवडणुकांसाठी निवडणूक अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली होती आणि आता राष्ट्रीय निवडणूक अधिकारी आणि राज्य यूनिट यांच्या समन्वयासाठी केंद्रीय निरीक्षकांच्या नियुक्तीची घोषणा भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष जेपी नड्डा यांनी केली आहे. राष्ट्रीय सरचिटणीस विनोद तावडे यांना उत्तर प्रदेश आणि बिहार या दोन्ही मोठ्या राज्यांचे केंद्रीय निरीक्षक करून भाजप हायकमांडनेही मोठे संकेत दिल्याचे मानले जात आहे.

यापूर्वी यूपीचे माजी संघटन प्रभारी अमित शहा आणि जेपी नड्डा भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष झाले आहे. त्यामुळे विनोद तावडे यांना उत्तर प्रदेश आणि बिहारचे केंद्रीय निरीक्षक करून तावडे हे राष्ट्रीय अध्यक्षपदाच्या शर्यतीत आघाडीवर असल्याचे मानले जात आहे. यूपीमध्ये विनोद तावडे यांच्यासह संजीव चौरसिया, संजय भाटिया आणि लाल सिंग आर्य यांना जबाबदारी देण्यात आली आहे.

महाराष्ट्र निवडणुकीच्या मतदानाच्या एक दिवस अगोदर तथाकथित पैसे वाटपाच्या आरोपांमुळे तावडे देशभर चर्चेत आले होते. मात्र या संपूर्ण प्रकरणाला स्वस्तातली नौटंकी म्हणत तावडे यांनी विरोधकांसह अनेक विरोधकांवर जोरदार प्रत्युत्तर दिले. सुप्रिया सुळे यांच्यासह नेत्यांना बदनामीची नोटीस राजकीय वर्तुळावर विश्वास ठेवला तर, या संपूर्ण प्रकरणाचा महाराष्ट्राच्या निवडणुकीत भाजपला मोठा फायदा झाला. मात्र, सर्व राष्ट्रीय सरचिटणीस आणि इतर अधिकाऱ्यांची विविध राज्यांचे केंद्रीय निरीक्षक म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

आतापर्यंत देशभरातील भाजप संघटनेत बूथ अध्यक्षांच्या निवडणुका होत होत्या आणि आता मंडळ अध्यक्ष आणि जिल्हाध्यक्षांच्या निवडणुकीच्या तारखा जाहीर झाल्या आहेत. देशभरातील भाजप मंडळ अध्यक्षांची निवडणूक १५ डिसेंबरपर्यंत तर जिल्हाध्यक्षांची निवडणूक ३० डिसेंबरपर्यंत होणार आहे. यानंतर प्रदेशाध्यक्षांच्या निवडणुकीसाठी दिल्लीत एक मोठी कार्यशाळा आयोजित केली जाईल. यामध्ये प्रदेशाध्यक्षांच्या निवडणुकीची कालमर्यादा निश्चित केली जाईल. जानेवारी अखेरीस प्रदेशाध्यक्षांच्या निवडणुका पूर्ण होतील, असे मानले जात आहे.

## सुट्टी देणार नाही, आरक्षण घेणारच : मनोज जरांगे

**आंतरवाली सराटी :** मुख्यमंत्री कोणीही होऊ द्या, आम्हाला त्याच्याशी घेणे देणे नाही. आम्हाला संघर्ष करावाच लागेल, असा इशारा मराठा आंदोलक मनोज जरांगे यांनी दिला आहे. एकनाथ शिंदे यांनी मुख्यमंत्रीपदावरील दावा सोडल्यानंतर देवेंद्र फडणवीसांचा मुख्यमंत्रिपदाचा मार्ग मोकळा झाल्याचे म्हटले जात आहे. यावर प्रतिक्रिया देताना मराठा आंदोलक मनोज जरांगे यांनी इशारा दिला आहे.

एकनाथ शिंदेनी घेतलेल्या भूमिकेवर बोलताना तो त्यांचा राजकीय विषय आहे, त्याच्यावर आम्ही बोलणे योग्य नाही, आम्ही आमच्याच कामात आहोत, असे मनोज जरांगे म्हणाले. मुख्यमंत्री कोणीही होवो, आम्हाला त्याच्याशी काही देणे घेणे नाही. आम्हाला संघर्ष करावाच लागणार आहे. कोणीही मुख्यमंत्री झाले तरी सुट्टी देणार नाही, आरक्षण घेणारच, असा इशाराही मनोज जरांगे पाटील यांनी दिला.

पुढे बोलताना मनोज जरांगे म्हणाले, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आरक्षणाबाबत काम करू शकले, आरक्षण मिळवून देऊ लागले, पण आम्हालाही लढावे लागले होते. आम्हाला सहजा सहजी मिळाले नाही, हे सत्य आहे. मुख्यमंत्री कोणाला करायचे हा त्यांचा विषय आहे. आम्ही आमच्या आमरण उपोषणाच्या तयारीला लागलो आहोत.

यावेळी मी आणि माझा समाज मैदानात नव्हतो. माझ्या समाजाने जे करायचे ते केले आहे. माझ्या समाजाशिवाय राज्यात कोणाचीच सत्ता येऊ शकत नाही. मराठा समाज ताकतीने प्रत्येकाच्या पाठीशी उभा राहिला आहे, आता सरकारने मराठा समाजाच्या पाठीशी उभे राहून त्यांना आरक्षण मिळवून द्यावे, मस्तीत येऊ नये. १३२ पेक्षा जास्त मतदार संघात २० हजाराच्या आसपास महायुतीचे उमेदवार निवडून आलेले आहेत, तिथे मराठ्यांनी सभा लावली असती, तर पूर्ण राख झाली असती. महायुती जास्त मतांनी निवडून आली म्हणजे आता तुमची जबाबदारी वाढली आहे, असेही मनोज जरांगे म्हणाले.

## महायुतीत मतभेद नाही; तिन्ही पक्ष मिळून मुख्यमंत्री पदाचा निर्णय घेऊ : देवेंद्र फडणवीस

**नागपूर :** आमच्या महायुतीमध्ये कुठलेही मतभेद नाहीत, असे म्हणत भाजप नेते देवेंद्र फडणवीस यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी घेतलेल्या पत्रकार परिषदेवर भाष्य केले आहे. नागपूर येथे पत्रकारांशी देवेंद्र फडणवीस यांनी संवाद साधला. पक्ष श्रेष्ठींशी चर्चा करून पुढील वाटचाल ठरवली जाणार असल्याचे देखील त्यांनी यावेळी सांगितले आहे.

देवेंद्र फडणवीस म्हणाले, शिंदे साहेब असतील, पवार साहेब असतील निश्चितपणे आम्ही सगळे एकत्रित आहोत. आमच्या महायुतीमध्ये कुठलेही मतभेद नाहीत. आम्ही निवडणुकीच्या पूर्वी देखील सांगितले होते की सगळे निर्णय सोबत बसून होतील. आमचे श्रेष्ठी असतील ते आमच्यासोबत बसून सगळे निर्णय घेतील. त्यामुळे मला असे वाटते की कोणाच्या मनात किंतु परंतु असेल तर आज माननीय एकनाथ शिंदे साहेबांनी तो देखील दूर केला आहे.

पुढे बोलताना देवेंद्र फडणवीस म्हणाले, मुख्यमंत्रिपदाबाबतच्या चर्चेला लवकरच आपल्याला उत्तर मिळेल. तिन्ही पक्ष मिळून मुख्यमंत्रिपदाबाबतचा निर्णय लवकरच घेतील. आम्ही सगळे पक्ष श्रेष्ठींशी चर्चा करत आहोत. लवकरच आपल्याला याचे उत्तर मिळेल.

आधी मुख्यमंत्री ठरेल आणि मुख्यमंत्री ठरल्यानंतर ते मंत्रीपदे कोणाला द्यायची हे ठरवतील. त्यामुळे मला असे वाटते की, आधी मुख्यमंत्र्यांची वाट पाहावी. त्यानंतर मंत्र्यांची देखील जी नावे आहेत, ती लक्षात येतील.

पुढच्या प्रक्रियेवर कशी असणार आहे, असा प्रश्न विचारला असता त्यावर देवेंद्र फडणवीस म्हणाले, या संदर्भात आमचे श्रेष्ठी यांच्यासोबत बैठक होईल आमची. तसेच यावेळी देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री होणार अशी चर्चा सुरू आहे यावर प्रतिक्रिया विचारली तेव्हा फडणवीसांनी हात जोडले.

## काँग्रेस ईव्हीएम विरोधात रान पेटवणार : नाना पटोले



**नागपूर :** महाराष्ट्रात विधानसभा निवडणुकीत महायुतीला प्रचंड बहुमत मिळाले असून महायुतीने पुन्हा एकदा महाराष्ट्रात सत्ता स्थापन करण्याच्या हालचाली सुरू केल्या आहेत. मात्र, महायुतीला मिळालेल्या या यशावर महाविकास आघाडीने ईव्हीएम मशीनवर शंका उपस्थित केली आहे. तसेच निवडणुका बॅलट पेपरवर घेण्याची देखील मागणी केली जात आहे. यावर काँग्रेस प्रदेशाध्यक्ष यांनी प्रतिक्रिया दिली आहे.

नाना पटोले माध्यमांशी बोलताना म्हणाले, जनतेचा आवाज बनून आम्ही आता जनआंदोलन सुरू करणार आहोत. जनतेला वाटत आहे की निवडणूक बॅलट पेपरवर घेण्यात यावी. बॅलट पेपरवरील निवडणुकांसाठी सह्यांची मोहीम आम्ही राबवणार आहोत. मतदान करण्याचा अधिकार आहे. मात्र मशीन आमचे मत चोरत असल्याची भावना जनतेत असल्याचे नाना पटोले यांनी सांगितले आहे.

पुढे बोलताना नाना पटोले म्हणाले, राहुल गांधी यांच्या नेतृत्वात जनआंदोलन आम्ही सुरू करणार आहोत. तसेच आम्ही निर्णय घेतला आहे की राहुल गांधी यांचे जन आंदोलन हे महाराष्ट्रात सर्वात मोठ्या प्रमाणात असणार आहे, अशी माहिती नाना पटोले यांनी दिली आहे.

दरम्यान, महाराष्ट्रात आता महायुतीचे सरकार स्थापन होणार असून त्यासाठी महायुतीच्या नेत्यांच्या हालचाली सुरू आहेत. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी देखील मुख्यमंत्रीपद सोडणार असल्याचे संकेत पत्रकार परिषदेत दिले आहेत. या आधी अजित पवारांनी देखील भाजपलाच पाठिंबा जाहीर केला होता. शिवसेनेकडून मुख्यमंत्रिपदावर दावा केला होता तसेच शिंदेंनाच मुख्यमंत्री करा, असा आग्रह देखील शिवसेनेने केला होता.

पंतप्रधान नरेंद्र मोदी तसेच केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्यासोबत एकनाथ शिंदे यांनी चर्चा केली व त्यानंतर त्यांनी पत्रकार परिषद घेत भूमिका बदलली असून भाजपला पाठिंबा जाहीर केला आहे. यामुळे आता देवेंद्र फडणवीस यांचा मुख्यमंत्रिपदासाठीचा मार्ग मोकळा झाला असल्याचे दिसत आहे.

महाराष्ट्र जनशक्ती
website: www.maharashtrajanshaktinews.com
छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरूवार २८ नोव्हेंबर २०२४

# मातोश्री डॉ. कंचन शांतीलालजी देसरडा पॅरॉमेडिकल कॉलेजमध्ये संविधान दिन साजरा





**छत्रपती संभाजीनगर (प्रतिनिधी) :** येथील मातोश्री डॉ. कंचन शांतीलालजी देसरडा महाविद्यालयात संविधान दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या सुरुवातीला शैक्षणिक विभाग प्रमुख डॉ. भाग्यश्री राठोड आणि प्रा. श्रुतिका कुलकर्णी-व्याहाळकर यांच्या हस्ते भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. हसन इनामदार हे होते, तर नूतन तुषारसिंग राजपूत, शंतनू खांड्रे, आशिया शेख, श्रेया इंगळे यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाचे प्रास्ताविक सबा खानम यांनी केले. याप्रसंगी सर्व विद्यार्थ्यांनी संविधानाचे वाचन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ज्योती प्रजापती यांनी तर राजनंदिनी नेते यांनी उपस्थितांतचे आभार मानले. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शारदा मापारी, अश्विनी जाधव, पायल वाकडे, दिनेश पावरा, मुकेश भारती, रामदास पावरा, मोहम्मद गुलअफशा, झिनत शेख, अन्सार पठाण, ओमकार पंडित यांनी परिश्रम घेतले.

# आठरा वर्षांनंतर एकत्र येत विद्यार्थ्यांनी दिला आठवणींना उजाळा



**कन्नड(अरुण थोरात):** जैतखेडा ता. कन्नड येथील नारायण विद्यालय या शाळेत माजी विद्यार्थ्यांचा (२००५-६) सुमारे १७ वर्षानंतर सर्व विद्यार्थ्यांनी एकत्र येऊनू स्नेहमेळावा आयोजित केला होता. आपापल्या क्षेत्रात कार्यरत राहून या विद्यार्थ्यांनी सामाजिक बांधिलकी म्हणून स्नेहमेळावा घेतला होता.

यावेळी सर्व विद्यार्थी-विद्यार्थिनी एकत्र आले होते. जुन्या शालेय आठवणींना उजाळा देताना विद्यार्थी आणि शिक्षकांनी शालेय अनुभव कथन केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी नारायण विद्यालयाचे मुख्याध्यापक अविनाश पाटील होते.

यावेळी संस्थेचे अध्यक्ष कृष्णा भाऊ नलावडे, सहशिक्षक राजेंद्र पाटील, मकरंद भातखेडकर, राजु पुर्भी, सुरेश परदेशी, रमेश वेताळ, अंबादास खिल्लारे आदी उपस्थित होते. विद्यार्थ्यांनी आपल्या शालेय जीवनातील जुने किस्से सांगुन कार्यक्रमात रंगत आणली, मान्यवरांनी आपले विचार मांडले. माजी विद्यार्थी भगवान मोरे यांनी सुत्रसंचलन केले, शाळेसाठी गरजु वस्तु व मदत लागेल तेव्हा हजर राहु असे माजी विद्यार्थ्यांनी सांगितले नारायण विद्यालय या शाळेत माजी विद्यार्थ्यांनी सुमारे १८ वर्षा नंतर सर्व विद्यार्थ्यांनी एकत्र येऊन स्नेहमेळावाआयोजित केला होता.

सर्व माजी विद्यार्थ्यांनी आपले मनोगत व्यक्त केले, गप्पा मारल्या, आनंदी वातावरणात एकत्रीत स्नेह भोजन केले. विद्यार्थ्यांच्या वतीने शिक्षकांचा सत्कार करण्यात आला. व शाळेस भेटवस्तू देण्यात आली.लंडन येथे कामानिमित्त स्थायिक असलेले मा. विद्यार्थी अमोल वेताळ यांनी दृकश्राव्य माध्यमातून कार्यक्रमात सहभाग नोंदवला. या कार्यक्रमास माजी विद्यार्थी भगवान मोरे, दीपक वेताळ, दगडू खिल्लारे, योगेश बडक, ईश्वर पांडे, निवृत्ती वेताळ, संदीप वेताळ, गोकुळ वेताळ, संतोष वेताळ, रामधन राठोड, अर्जुन जाधव, बाळासाहेब आळंसकर, सुनील खिल्लारे, सुदर्शन वेताळ, श्रीराम वेताळ ,गोविंद आडे ज्ञानेश्वर राठोड, गोरख राठोड, उज्वला वेताळ, सोपान वेताळ, पोपट वेताळ, सीमा खिल्लारे, छाया डेडवाल, मुक्ता वेताळ, कावेरी वेताळ, सिमा वेताळ आदी उपस्थित होते.

१८ वर्षांनंतरही शिक्षकांप्रती आदर, भीती: संपादित केलेल्या ज्ञानाच्या आधारावर समाजात वावरताना, ज्ञान प्रदान करणाऱ्या त्या गुरुजनास न विसरता १८ वर्षांनंतरही माजी विद्यार्थी वयाने मोठे झाले, पालक झाले तरी ही शिक्षकांना एवढ्या वर्षांनी पाहून आदर व भीती स्पष्ट दिसून येत होती. अभिमानास्पद वाटणारा गुरुच्या आदर्शानुसार शेती, व्यवसाय, उद्योग, शिक्षक, उच्च पदस्थ व सामाजिक क्षेत्रात स्वकृत्वाने उल्लेखनीय कार्य करत आहेत. यावेळी शिक्षक म्हणाले, विद्याच्यर्थ्यांनी स्नेहसंमेलनाच्या माध्यमातून एकत्र येत आपल्या जुन्या आठवणीत एकमेकांना आधार देत जीवन यशस्वी जगावे. तुम्ही १८ वर्षांनंतर केलेले हे आयोजन नक्कीच प्रेरणा देणारे आहे. इतर विद्यार्थ्यांना आदर्शवत ठरावे यासाठी तुम्ही असेच शाळेत येत जा. असे अवाहन केले.

## एअर इंडियाच्या महिला पायलटची आत्महत्या



एअर इंडियाची २५ वर्षीय महिला पायलट मुंबईतील तिच्या फ्लॅटमध्ये मृतावस्थेत आढळून आला. पोलिसांनी सांगितले की, तिच्या प्रियकराला आत्महत्येस प्रवृत्त केल्याच्या आरोपाखाली अटक करण्यात आली आहे. सध्या पोलीस या प्रकरणाचा तपास करत आहेत. तिचा प्रियकर आदित्य पंडित याने हत्येसाठी प्रवृत्त केल्याचा आरोप कुटुंबीयांनी केला आहे.मिळालेल्या माहितीनुसार, एअर इंडियाची पायलट सृष्टी तुली हीचा मृतदेह तिच्या अंधेरी येथील फ्लॅटमध्ये लटकलेल्या अवस्थेत आढळून आला. पवई पोलिसांनी तिचा २७ वर्षीय प्रियकर आदित्य पंडित याला आत्महत्येस प्रवृत्त केल्याच्या आरोपाखाली अटक केली आहे.पंडित तिच्याशी गैरवर्तन करायचा आणि फोनवरून अनेकदा वाद घालायचा, त्यामुळे सृष्टीने हे पाऊल उचलल्याचा आरोप सृष्टीच्या कुटुंबीयांनी केला आहे.सध्या पोलिसांनी सृष्टीच्या प्रियकरावर आत्महत्येस प्रवृत्त केल्याच्या आरोपावरून गुन्हा दाखल करून त्याला अटक केली असून, त्याला न्यायालयात हजर केल्यानंतर त्याला २९ तारखेपर्यंत पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे. ही तक्रार मुलीच्या काकांनी पोलिसात दिली असून, पुढील तपास पोलिस अधिकारी करत आहेत.

महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरूवार २८ नोव्हेंबर २०२४


# खाम नदी पुर विश्लेषण अहवालाचे विमोचनपूर परिस्थिती नियंत्रणासाठी मनपाचे मोठे यश



**छत्रपती संभाजीनगर (माहिती व जनसंपर्क विभाग)** छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेच्या वतीने खाम नदी पूर विश्लेषण अहवाल तयार करण्यात आला आहे.यामुळे पूर परिस्थिती नियंत्रणासाठी मोठी मदत होणार आहे.

महाराष्ट्र शासन आणि संयुक्त राष्ट्र विकास कार्यक्रम (UNDP) यांच्या संयुक्त विद्यमाने महाराष्ट्रातील आपत्ती व्यवस्थापनाचे बळकटीकरण कार्यक्रमा अंतर्गत खाम नदीचे पूर परिस्थितीचे विश्लेषण करून अॅल्यूबियम संस्था जी पूर आराखडा तयार करण्यासाठी तज्ञ आहेत. (Flood Modelling) यांचेकडून एक अहवाल तयार करण्यात आला आहे.

सबंधित संस्थेने छत्रपती संभाजी नगर महानगरपालिकेतील अधिकारी व तज्ञ मंडळींशी वेळोवेळी सल्लामसलत करून खाम नदीचा मनपा हद्दीतील सात किलो मिटर परिसराचा अभ्यास केला आहे.ज्यामध्ये पावसाचे प्रमाण ,हर्सूल तलावात पाणी साचून पुढील २५ ते १०० वर्षात पुराची परिस्थिती कशी असेल याबाबत माहिती दिलेली आहे.

तसेच खाम नदीच्या पात्रात कसे बदल घडून येतात यावरही अहवालात बाब नमूद करण्यात आली आहे.

यांकरिता पूर व्यवस्थापनासाठी वेब पोर्टल तयार करण्यात आले आहे. त्या मध्ये झोन क्रं.०१ व ०४ चा समवेश होता. सदर अहवाल तयार करण्यासाठी स्मार्ट सिटी कार्यालय येथे माहे मार्च,जुलै व सप्टेंबर २०२४ या कालावधीत मा.आयुक्त तथा प्रशासक जी श्रीकांत यांच्या अध्यक्षतेखाली तीन कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यशाळेला अतिरिक्त आयुक्त ०१ व ०२,शहर अभियंता, उप संचालक नगर रचना, सर्व कार्यकारी अभियंता, वार्ड अभियंता, वार्ड अधिकारी, मुख्य अग्निशमन अधिकारी, मुख्य आपत्ती व्यवस्थापन अधिकारी यांचा समावेश होता.

सदर कार्य शाळेनंतर जपान इंटरनॅशनल कॉर्पोरेशन एजन्सी, जायका (JAIKA) व संयुक्त राष्ट्र संघटना विकास कार्यक्रम (UNDP) यांनी अंतिम अहवाल छत्रपती संभाजी नगर महानगरपालिकेकडे सादर केला.

खाम नदीचे फ्लड हायड्रोलिक मॉडेल प्रथमच सविस्तरपणे बनविण्यात आला आहे. हा अहवाल तयार करण्यासाठी मुख्य आपत्ती व्यवस्थापन अधिकारी स्वप्नील सरदार यांनी विशेष परिश्रम घेतले.

सदर अहवालाचे आज मनपा मुख्यालय येथे मां.आयुक्त तथा प्रशासक जी श्रीकांत यांच्या हस्ते विमोचन करण्यात आले.

यावेळी मां.अतिरिक्त आयुक्त रणजीत पाटील, संतोष वाहुळे, शहर अभियंता ए.बी देशमुख, उप संचालक नगर रचना मनोज गर्जे, वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ पारस मंडलेचा, उप आयुक्त अंकुश पांढरे, लखीचंद चव्हाण, अपर्णा थेटे, कार्यकारी अभियंता अमोल कुलकर्णी,फारुख खान, मोहिनी गायकवाड, के. एम फालक, मुख्य आपत्ती व्यवस्थापन अधिकारी स्वप्नील सरदार व इतर अधिकारी यांची उपस्थिती होती.

# विधानसभा निवडणुकीत पत्रकारांनी महत्वाची भूमिका बजावली : तहसिलदार कडवकर



**कन्नड (अरुण थोरात):** नुकत्याच पार पडलेल्या विधानसभा निवडणुकीत तालुक्यातील सर्व पत्रकार बांधवांनी, आपल्या पत्रकारितेच्या माध्यमातून सतत चांगल्या बातम्या प्रसारित करुण सकारात्मक प्रतिसाद देत सहकार्य केल्याने, लोकसभा निवडणुकीप्रमाणे विधानसभा निवडणूकीत मतदानाचा टक्का वाढला, यात पत्रकारांचे मोठे योगदान आहे, असे प्रतिपादन सहायक निवडणूक निर्णय अधिकारी तथा तहसिलदार विद्याचरण कडवकर यांनी व्यक्त केले आहे.

ते दि. २६ नोव्हेंबर रोजी निवडणूक निर्णय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी संतोष गोरड यांच्या दालनात, खास पत्रकारांसाठी आयोजित केलेल्या छोटेखानी कार्यक्रमात ते बोलत होते.

या वेळी बोलताना ते पुढे म्हणाले की, आम्ही आतापर्यंत वेगवेगळ्या ठिकाणी नोकरी केली, निवडणुकीचे काम केले मात्र पत्रकार बांधवांच्या बाबतीत आम्हाला या शहरात एक सुखद चांगला अनुभव आला.

सर्वच पत्रकारांनी सकारात्मक भूमिका घेऊन निवडणूक विभागाला सहकार्य केले आणि त्यामुळेच हा 'लोकशाहीचा उत्सव' व्यवस्थितरीत्या साजरा करता आला.

आपल्या मतदार संघात स्वीप पथकाने केलेल्या प्रत्येक कामाची, उपक्रमाची दखल पत्रकार बांधवांनी घेतली. या बाबतीत आपण राज्यात पहिल्या क्रमांकावर आहोत. याचा सर्वांना अभिमान वाटतो.

या वेळी निवडणूक निर्णय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी संतोष गोरड म्हणाले की, निवडणुकीच्या या प्रक्रियेत सर्व पत्रकारांचे अनमोल असे सहकार्य लाभले.

उपविभागीय अधिकारी पदाचा पदभार स्वीकारल्यानंतर ही माझी पहिलीच निवडणूक होती.

आपणा सर्वांच्या सोबत काम करता आले. आणि सर्व सुरळीत पार पडले. असेच सहकार्य आपणाकडून मिळत राहो, अशी भावना त्यांनी व्यक्त केली.

या प्रसंगी निवडणूक विभागाचे नायब तहसीलदार श्री उगले, पुरवठा विभागाचे अधिकारी निलेश राठोड, पुरवठा निरीक्षक वैभव तोंडे, श्री सोनवणे व पत्रकार बांधवांची उपस्थिती होती.




# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरूवार २८ नोव्हेंबर २०२४


## माधवराव पाटील महाविद्यालयात संविधान दिन व शहीद जवानांना श्रध्दांजली अर्पण



मुरूम, ता. उमरगा येथील माधवराव पाटील महाविद्यालयात संविधान दिन साजरा करताना प्राचार्य अशोक सपाटे, चंद्रकांत बिराजदार, सतिश शेळके, महेश मोटे, सायबण्णा घोडके, प्रतापसिंग राजपूत, शिला स्वामी व अन्य.

**मुरूम, (प्रा. सुधीर पंचगल्ले) :** येथील श्री माधवराव पाटील महाविद्यालयात महाराष्ट्र अंधश्रध्दा निर्मूलन समिती, धाराशिव, राज्यशास्त्र पदवी-पदव्युत्तर व संशोधन केंद्र व राष्ट्रीय सेवा योजनेच्या संयुक्त विद्यमाने मंगळवारी (ता. २६) रोजी ७५ वा संविधान दिन तथा अमृत महोत्सव दिन साजरा करण्यात आला.

प्रारंभी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अशोक सपाटे यांच्या हस्ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी २६ /११ हल्ल्यातील शहीद जवानांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करून महाविद्यालयातील प्रा. अजिंक्य राठोड यांनी सामुहिक संविधानाच्या उद्देशपत्रिकेचे वाचन केले. या दिनाचे औचित्य साधून प्रा. डॉ. महेश मोटे लिखित निवडणूकविषयक सुधारणा : आज, काल व उद्या या विषयावरील ग्रंथाचे प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी महाअंनिसचे जिल्हा कार्यध्यक्ष प्रा. डॉ. महेश मोटे यांनी संविधानाचे महत्त्व या विषयावर मार्गदर्शन केले. यावेळी उपप्राचार्य डॉ. चंद्रकांत बिराजदार, प्रा. डॉ. सतिश शेळके, राष्ट्रीय सेवा योजनेच्या कार्यक्रमाधिकारी प्रा. डॉ. शिला स्वामी, महाराष्ट्र पत्रकार संघाचे मराठवाडा कार्यकारिणी सदस्य प्रा. डॉ. सुधीर पंचगल्ले, प्रा. डॉ. शिवपुत्र कानडे, प्रा. डॉ. मुकुंद धुळेकर, प्रा. डॉ. विनायक रासुरे, माजी मुख्याध्यापक कमलाकर मोटे आदींची प्रमुख उपस्थिती होती. डॉ. किरण राजपूत, डॉ. राम बजगिरे, डॉ. पुरुषोत्तम बारवकर, डॉ. महादेव कलशेट्टी, डॉ. राजू शेख, डॉ. अविनाश मुळे, डॉ. जयश्री सोमवंशी, डॉ. संध्या डांगे आदींनी पुढाकार घेतला.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. डॉ. सायबण्णा घोडके यांनी केले. सूत्रसंचलन प्रा. डॉ. प्रतापसिंग राजपूत तर आभार प्रा. अशोक बावगे यांनी मानले. यावेळी विविध शाखेतील विद्यार्थी-विद्यार्थीनी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

## तरुणांच्या आरोग्यावर मधुमेहाचा वाढता प्रभाव : डॉ. निशा पानसरे यांनी व्यक्त केली चिंता

**पुणे :** अलिकडच्या वर्षांत तरुणांमध्ये मधुमेहाचे प्रमाण वाढले आहे, ज्यामुळे सामान्य आरोग्याबरोबरच प्रजनन आरोग्यावरही परिणाम झाला आहे. मधुमेहामुळे तरुण पिढीच्या आरोग्यावर होणारे गंभीर परिणाम समजून घेणे आवश्यक आहे, कारण खाण्याच्या चुकीच्या सवयी आणि जीवनशैलीतील बदल हे या वाढत्या महामारीस कारणीभूत ठरत आहेत, असे मत नोव्हा आयव्हीएफ फर्टिलिटीचे प्रजनन सल्लागार डॉ निशा पानसरे यांनी दिली आहे.

डॉ . पानसरे म्हणाल्या, टाईप २ मधुमेह, जो ३० वर्षांखालील तरुणांमध्ये अधिक सामान्यपणे आढळून येत आहे. तणाव, खाण्याच्या चूकीच्या सवयी, बैठी जीवनशैली तसेच अनुवांशिक कारणांमुळे मधुमेह होतो. वेळीच उपचार न केल्यास दीर्घकालीन आरोग्य समस्या उद्भवू शकतात.

मधुमेहाचा प्रजनन आरोग्यावर लक्षणीय परिणाम होतो. संशोधनानुसार, अनियंत्रित रक्तातील साखरेची पातळी हार्मोनल विकृतींशी जोडली गेली आहे जी स्त्री आणि पुरुष दोघांच्या प्रजननक्षमतेवर परिणाम करते. पॉलीसिस्टिक ओव्हेरियन सिंड्रोम , अनियमित मासिक पाळी आणि गर्भपाताचा वाढलेला धोका हे सर्व स्त्रियांमध्ये मधुमेहाचे परिणाम आहेत. इन्सुलिन रेझिस्टन्स, जो ओव्हुलेशनच्या समस्यांशी जोडलेला आहे आणि स्त्रियांना गर्भधारणा करणे अधिक कठीण बनवते, उच्च रक्तातील साखरेची पातळी देखील गर्भधारणेत अडचणी निर्माण करते.पुरुषांमध्ये मधुमेहाने टेस्टोस्टेरॉनची पातळी कमी होते, इरेक्टाइल डिसफंक्शन आणि शुक्राणूंची संख्या आणि प्रमाण कमी होते ज्यामुळे प्रजनन क्षमता लक्षणीयरीत्या कमी होते. ऑक्सिडेटिव्ह तणावामुळे पुरुषांचे पुनरुत्पादक आरोग्य आणखी गुंतागुंतीचे होते, मधुमेहामुळे उद्भवणाऱ्या चयापचय विकृतींमुळे शुक्राणूंच्या डीएनएचे नुकसान होते. मधुमेह असलेल्या पुरुषांच्या रक्तातील साखरेचे व्यवस्थापन बिघडते आणि मुलांमध्ये अनुवांशिक विकृती होण्याची शक्यता अधिक असते.

भविष्यातील पिढ्यांवर होणाऱ्या व्यापक परिणामांचा विचार करताना तरुणांमध्ये मधुमेहाचे वाढते वाढणे ही एक चिंतेची बाब आहे. मधुमेह असलेल्या गर्भवती महिलांच्या बाळाल लठ्ठपणा आणि मधुमेह तसेच इतर आरोग्य समस्या होण्याची शक्यता असते. या जनरेशनल लूपमुळे मधुमेहाची महामारी लांबू शकते आणि त्यावर मात करणे अधिक कठीण होऊ शकतेमधुमेह व्यवस्थापनाचे महत्त्वाचे घटकांमध्ये तणावाचे व्यवस्थापन, व्यायाम करणे आणि संतुलित आहाराचे सेवन करणे यांचा समावेश आहे. मधुमेहाशी संबंधित धोके कमी करण्यासाठी, मधुमेहींनी गर्भधारणा करण्यापूर्वी योग्य वैद्यकिय सल्ला व औषधोपचार करावे जेणेकरून गर्भधारणेपूर्वी आणि संपूर्ण गर्भधारणेदरम्यान त्यांच्या रक्तातील साखरेची पातळी योग्य राखता येईल.

## विजयस्तंभास अभिवादन सोहळा कार्यक्रमाच्या नियोजनाचा जिल्हाधिकाऱ्यांकडून आढावा



**पुणे :** पेरणे फाटा येथे १ जानेवारी २०२५ रोजी आयोजित करण्यात येणारा विजयस्तंभ अभिवादन सोहळा शांततेत आणि उत्साहात साजरा व्हावा तसेच येणाऱ्या अनुयायांना आवश्यक त्या सोयीसुविधा पुरवण्यासाठी सर्व विभागांनी आवश्यक नियोजन करावे, असे निर्देश जिल्हाधिकारी डॉ. सुहास दिवसे यांनी दिले.

विजयस्तंभ अभिवादन सोहळ्याच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित आढावा बैठकीत ते बोलत होते. बैठकीस जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी संतोष पाटील, पोलीस सहआयुक्त रंजन कुमार शर्मा, अपर पोलीस आयुक्त वसंत परदेशी आदी उपस्थित होते.

डॉ. दिवसे म्हणाले, येत्या 1 जानेवारी रोजी विजयस्तंभ अभिवादन सोहळ्या येणाऱ्या अनुयायांची संख्या लक्षात घेता त्यादृष्टीने सर्व बाबींचे सूक्ष्म नियोजन करावे. वाहतूक व्यवस्था, वाहनतळाचा आराखडा बारकाईने तयार करावा, त्यासाठीच्या जागा निश्चित कराव्यात. स्वच्छतेसाठी पथकांची नियुक्ती आणि स्वच्छतागृहांसाठी पुरेशा प्रमाणात पाण्याची सुविधा करावी. तसेच पिण्याच्या पाण्यासाठी टँकरची संख्याही विचारात घ्यावी.

पोलीस विभागाने वाहतूकीचे नियोजन करण्यासह कायदा व सुव्यवस्थेबाबत नियोजन करावे. हवेली व पुणे शहर उपविभागीय अधिकारी, पोलीस विभाग व पीएमपीएमएलने 31 डिसेंबर आणि 1 जानेवारीसाठी पुरेशा बसेसची संख्या निश्चित करावी. पीएमपीएमएलने वाहनात इंधन भरण्याचीही पुरेशी व्यवस्था करावी. सार्वजनिक बांधकाम विभाग आणि जिल्हा परिषद बांधकाम विभागाने रस्त्यांची डागडुजी करून घ्यावी.

गतवर्षीच्या तुलनेत वैद्यकीय अधिकारी-कर्मचाऱ्यांची संख्या वाढवावी, अनुयायांची संख्या लक्षात घेऊन रुग्णवाहिकांची संख्या वाढवावी. संपूर्ण सोहळ्यावर नियंत्रण ठेवण्यासाठी परिसरात नियंत्रण कक्ष स्थापन करावे. सर्व संबंधित विभागाने सोहळ्याच्या अनुषंगाने जागेची पाहणी करावी. सोहळा यशस्वी करण्यासाठी सर्व संबंधित विभागाने समन्वयाने काम करावीत, अशाही सूचना डॉ. दिवसे यांनी दिल्या.

अपर पोलीस आयुक्त शर्मा म्हणाले, येणाऱ्या अनुयायांची संख्या तसेच गर्दीचा विचार करुन पुस्तक स्टॉलची संख्या निश्चित करावी. विजयस्तंभजवळ असणाऱ्या मान्यवरांची यादी बार्टीने तयार करुन पोलीस विभागाकडे पाठवावी, असेही शर्मा म्हणाले.

जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी पाटील म्हणाले, अनुयायांची संख्या लक्षात घेता शौचालयाची संख्या आणि त्यांची स्वच्छतेबाबत नियोजन करावे. जिल्हा परिषदेच्या अधिनस्त येणारी कामे वेळेत पूर्ण करण्यात येईल.

यावेळी विजयस्तंभ परिसराचे सुशोभिकरण, प्रकाशव्यवस्था, स्टॉल, मंडप उभारणी, वाहनतळ, वाहतूक आराखडा, आरोग्य सुविधा, पिण्याचे पाणी, रस्त्यांची दुरुस्ती, तात्पुरते शौचालय उभारणी, स्वच्छतेसाठी घंटागाड्या, आपत्तकालीन प्रसंगी अग्नीशमन वाहनांची व्यवस्था, विद्युत व्यवस्था, हिरकणी कक्ष, आपत्ती व्यवस्थापन आदीबाबत सविस्तर आढावा घेण्यात आला.

## अनुभवजन्य शिक्षण देण्याची आवश्यकता

**जळगाव :** कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठात 'हॅन्डस ऑन एक्सपिरियन्स ऑन टीचिंग एड्‌ : टेक्नॉलॉजी इंटिग्रेशन' ही कार्यशाळा झाली. यात प्र-कुलगुरू एस. टी. इंगळे यांनी विद्यार्थ्यांमध्ये शिक्षणाप्रती निर्माण झालेली उदासीनता दूर करण्यासाठी शिक्षण प्रक्रियेच्या माध्यमातून अनुभवजन्य शिक्षण उपलब्ध करून दिले पाहिजे, असे मत व्यक्त केले. प्रा.इंगळे म्हणाले की, खासगीकरण आणि स्वायत्तता यामुळे शिक्षणाच्या गुणवत्तेवर खूप मोठा परिणाम झाला आहे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० ची उद्दिष्टे पूर्ण करण्यासाठी अशा विविध कार्यशाळा आयोजित करून त्या माध्यमातून विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण उपलब्ध करून दिले पाहिजे. मंचावर संचालक डॉ. मनीषा इंदाणी उपस्थित होते. नूतन मराठा अध्यापक विद्यालयातील प्रा. आर. एस. पाटील यांनी शैक्षणिक साहित्य म्हणून अध्ययन अध्यापनात वापरल्या जाणाऱ्या साधनांचा परिचय करून देत साधनाच्या निर्मितीची प्रक्रिया समजावून सांगितली. या वेळी प्राध्यापक उपस्थित होते.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरूवार २८ नोव्हेंबर २०२४


# भारतीय स्त्री मुक्तीचे आद्य प्रवक्ते : महात्मा फुले



बोले तैसा चाले त्याची वंदावी पाऊले...ही उक्ती सार्थ करणारे महात्मा फुले हे भारतीय इतिहासातले आद्य समाज क्रांतिकारक होत. महात्मा फुले नावाची व्यक्ती नव्हे तर विचार म्हटला पाहिजे. आपले विचार प्रत्यक्ष आचरणात आणणारे ते बंडखोर युगपुरुष होते. त्यांचे कार्य बहुपेडी आहे. आपल्या वैचारिक मांडणीतून आणि कृतीमधून त्यांनी अनेक आघाड्यांवर लढा दिला.

जातीप्रथा, ब्राह्मणी धर्माचे वर्चस्व, स्त्रियांचे शोषण, शेतकरी-कष्टकरी यांची पिळवणूक, सांस्कृतिक गुलामगिरी ह्या सर्व आघाड्यांवर संघर्ष केला. त्यांचा हा संघर्ष सत्यशोधनावर आधारलेला होता. ' हिंदू समाजातल्या बहुजन समाजात आत्मप्रत्यय आणि आत्मावलोकन उत्पन्न करणारा पहिला माणूस म्हणजे ज्योतिबा फुले होय.

शतकानुशतके अज्ञानाने, दारिद्र्याने व हीन संस्कृतीने ग्रासलेल्या हिंदू समाजातल्या जनतेला आत्मपरीक्षण करण्याचा पहिला आदेश ज्योतीबामुळे मिळाला'', अशा शब्दात तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी ज्योतीबांचा गौरव केला आहे.

ज्योतीबांचे ध्येय होते 'एकमय लोक' आणि त्यांना समाजाचे नेमके दुखणे काय आहे, याची जाण होती. म्हणूनच शोषित, पराभूत समाजाचा पर्यायी इतिहास लिहू पाहणारे फुले आपल्या इतिहासातली एक महत्वाची क्रांतिकारी शक्ती होती हे विसरता कामा नये.

स्त्रिया, दलित, कष्टकरी आणि शेतकरी यांचे होत असलेले शोषण सर्वात प्रथम फुलेंना जाणवले. ज्योतीबांनी १८४८ मध्ये मुलींसाठी पहिली शाळा पुण्यात सुरु केली.

बहुजन समाजाला, अस्पृशांना आणि त्यातही प्रामुख्याने स्त्रियांना शिक्षण द्यावे असा आग्रह त्यांनी केला. ऐतिहासिकदृष्ट्या ही घटना अत्यंत महत्वाची होती. आज शतकानंतरही तळागाळातील समाजातल्या स्त्रियांचे जगणे अपार कष्ट सोसण्यातच जाते. आजही कुपोषण, बालविवाह, प्रसूतीदरम्यान होणारे मृत्यू, मारहाण, अन्याय हेच सर्वसामान्य स्त्रीच्या जीवनाचे प्राक्तन आहे. अलीकडे तर गर्भातच स्त्री ला मारले जात आहे.

आपला देश खंडप्राय आहे. देशात प्रादेशिक विविधता मोठ्या प्रमाणात दिसून येते. आपल्या देशातल्या स्त्रियांचे जीवनही ह्या प्रादेशिकतेशी जोडले गेलेले आहे.

भारतीय स्त्री जीवन जात-वर्ग-धर्म यांच्या चौकटीत बंदिस्त झालेले आहे.त्यामुळे शोषणाची तीव्रता आणि स्वरूप यात समानता नाही. त्यात वेगळेपण आहे. आजही खेड्या-पाड्यात भूमिहीन शेतमजूर म्हणून काम करणाऱ्या स्त्रियांची संख्या लक्षणीय आहे. ह्या स्त्रियांचे आपले सारे आयुष्य आपल्या कुटुंबाचे पालन-पोषण करण्यातच खर्ची पडते.

पिण्यासाठीचे पाणी, स्वन्पाकासाठीचे सरपण- इंधन ह्या जगण्यासाठीच्या प्राथमिक बाबींची पूर्तता करताना होणारी स्त्रियांची ससेहोलपट आधुनिकीकरणाच्या काळातही थांबलेली नाहिये.

दिवसाचे १५ ते २० तास काम करणाऱ्या कष्टकरी स्त्रियांना कुपोषण, वेदनादायी प्रसूती आणि अतिशय हीन जीवन जगावे लागत आहे. श्रीमंत शेतकरी, व्यापारी वर्गातल्या स्त्रियांची स्थिती फारशी वेगळी नाही. कुटुंबाच्या चौकटीत संरक्षण तर दूरच प्रसंगी अत्याचाराला तोंड द्यावे लागते.

उच्च जातीतल्या, मध्यम वर्गातल्या स्त्रिया विविध क्षेत्रात कर्तबगारी गाजवताना दिसत आहेत. पण ह्या स्त्रियांच्या घरातल्या परिस्थितीत झालेले मूलगामी बदल फार कमी प्रमाणात आढळतात.

भारतीय समाज रचना बहुपेडी आणि विषम आहे. ह्या शोषित-पिडीत-वंचित समाजाला आहे तेथेच ठेवून फक्त कल्याणकारी सुधारणांच्या नावाखाली वरवरच्या उपाययोजना करून प्रश्न सोडवणे ज्योतीबाना मान्य नव्हते. ब्राह्मणी धर्माची, प्राचीन पोथ्या, पुराणाची, जुन्या धर्मग्रंथांची आणि त्यातून उदयास आलेल्या सामजिक मूल्यांची ज्योतीबांनी परखड चिकित्सा केली.

त्यांनी सार्वजनिक सत्यधर्माची नवीन संकल्पना मांडली. अंधश्रद्धा, चमत्कार यांच्यावर ताशेरे ओढले. सत्य आणि विवेक ह्या नवमूल्यांचे रोपण केले. महाराष्ट्राचा इतिहास सांगणारा पोवाडा रचला. यातून शिवाजी महाराजांना 'कुळवाडी भूषण' म्हणून शेतकरी समाजाचा हितचिंतक आणि संरक्षक या रुपात पुढे आणले.

ज्योतिबा फुलेंच्या पुण्यातल्या शाळेत शिकणाऱ्या एका ११ वर्षाच्या मुलीने लिहिलेला निबंध महत्वाचा आहे. ही मुलगी मातंग समाजाची होती. यात विचारलेले प्रश्न मूलगामी होते. तिच्या या मांडणीचे श्रेय जोतीबाना जाते.

१८९१ मध्ये प्रसिद्ध झालेल्या 'सार्वजनिक सत्यधर्म' या पुस्तकातला 'स्त्री आणि पुरुष' हा संवाद त्यांची विचारधारा सांगणारा आहे. मानव जातीला जन्म देणारी, संगोपन करणारी, संवर्धन करणारी स्त्री पुरूषापेक्षा निर्विवाद श्रेष्ठ आहे असे मत स्पष्टपणे नोंदवतात. स्त्रियांच्या दुय्यमत्वाची कारणे त्यांच्या नैसर्गिक शरीरधर्मात नसून पुरुषांच्या कावेबाजपणात आहेत असे फुल्यांनी म्हटले आहे.

स्त्रियांना खरी सत्ता मिळण्यासाठी त्यांना सारासार विवेकाचे बळ मिळणे आवश्यक आहे. यासाठी स्त्रियांना शिक्षण देण्याचा ते आग्रह धरतात. या पुस्तकात उच्च-नीच उतरंडी चा विरोध करणारी, श्रमिकांना सन्मान देणारी, लोकशाहीपूरक आणि शोषण विरोधी मूल्ये आपल्या विशिष्ट शैलीत मांडली आहेत. स्त्रियांचा विशेषत्वाने केलेला उल्लेख हे या मांडणीचे अजून एक वैशिष्ट! स्त्री-पुरुष समानतेचे महत्व आग्रहाने मांडले आहे. ' आज आपल्याकडे मतदानाचा हक्क न झगडताच मिळाला पण त्याने आमच्या समाज व्यवस्थेला धक्कासुद्धा पोहचत नाही.

मुक्तपणाने सोसणाऱ्या स्त्रियांच्या हाती घराचा, समाजाचा आणि राज्याचा कारभार द्यायचा झाला तर त्यांना आपल्याला काय हवे, काय नको हे बोलण्याचे बळ आणि निर्भयता हवी. हे निर्माण करण्याचा पहिला प्रयत्न जोतीरावानी केला हे त्यांचे फार मोठे श्रेय आहे,'' असे मत ज्येष्ठ स्त्रीवादी विचारवंत विद्युत भागवत यांनी व्यक्त केले आहे.

नऊ महिने उदरी ओझे वागविणाऱ्या स्त्री जातीवर गुरगुरणारा 'उपट सुळ' अशा शब्दात फुले आपल्या आया-बहिणींवर अन्याय-अत्याचार करणाऱ्या पुरुषाचा धिक्कार करतात. पुरुष व स्त्री यात सर्वात जास्त पक्षपात पुरुष करतात. पुरुष स्वत;ला धाडसी समजतात. नवरा मरण पावल्यावर बायको सती जाते. मग, एखाद्याची बायको मरण पावली तर नवरा 'सता' का जात नाही, असा प्रश्न फुले करतात.

पुरुषाचे स्त्रीवर प्रेम नसते,ते एक गरज म्हणून स्त्रीला घरात आणतात, असे त्यांचे मत होते. महात्मा फुल्यांनी बालविवाह,सतीप्रथा,जरठ कुमारिका अशा स्त्री विषयक मूलभूत प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा केली.

फुल्यांच्या समकालीनांमध्ये आगरकरांनी स्त्री-पुरुष समानतेचा विचार बंडखोर प्रवृत्तीने मांडला.

लोकहितवादी अर्थात गोपाळ हरी देशमुख हे केवळ बोलके सुधारक असल्याचे त्यांच्या कृतीतून सिद्ध झाले आहे. न्या. रानडे यांनी आयुष्यभर विधवा पुर्नविवाहाचे समर्थन केले. पण ते विधुर झाल्यावर मात्र त्यांनी विधवेशी विवाह न करता कुमारिकेशी केला. न्या. रानडे यांचे पट्टशिष्य ना. गोखले यांनी तर चक्क पहिली बायको जिवंत असताना दुसरे लग्न केले.

रानडे यांचे अग्रणी न्या. तेलंग यांनी आपल्या मुलीचा विवाह भरपूर हुंडा देवून आठव्या वर्षीच केला. या पार्श्वभूमीवर फुल्यांचे वेगळेपण उठून दिसते. अपत्य होत नाही म्हणून त्यांनी दुसरा विवाह केला नाही. तसेच विधवा ब्राह्मण काशीबाईच्या मुलाला- यशवंत यास दत्तक घेऊन एक वेगळा आदर्श घालून दिला.

सावित्रीबाई, फातिमा बी, मुक्ता साळवे, ताराबाई शिंदे, पंडिता रमाबाई, आनंदीबाई जोशी यांच्या कार्यामागची प्रेरणा फुलेच आहेत. खरोखरच महात्मा जोतीबा फुले हे भारतीय स्त्रीमुक्ती चळवळीचे आद्य प्रवक्ते ठरतात, यात शंका नाही!




**प्रा. डॉ. प्रवीण घोडेस्वार**

**(लेखक यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठात प्रोफेसर आहेत.)**

**मो. क्र. ९४०३७७४५३०**